**नि.दि. दावा ६/२०१४.**
**केशव वि. वासुदेव व इतर.**
**निशाणी क्र.६९ वरुन पुढे...**

**<u>प्रतिवादींतर्फे सा.क.१ यांचा पुढील उलट तपास शपथेवर सुरु</u>.**
**<u>वादीतर्फे विधीज्ञ श्री. जी.पी. खैरकार यांच्यामार्फत सुरु</u>.**

माझे नाव : नितीन दत्तुजी वासेकर.
वय सुमारे : ४२ वर्ष, व्यवसाय : शेती व व्यापार.
राहणार : मेघदुत कॉलनी, चिखलगांव, ता. वणी, जि. यवतमाळ.

३२. हे म्हणणे खरे आहे की या दाव्यातील वाद शेताबद्दल मी दुसरा दावा दाखल केला आहे. मी या दाव्यामधे प्रतिदावा का दाखल केला नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की मला या दाव्यातील वादीविरुद्ध दुसरा दावा दाखल करण्याचा कोणताही अधिकार नाही किंवा तसा दावा कायदेशीरदृष्ट्या मला दाखल करता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की आज रोजी वाद शेतावर वादीचा मुलगा वादी क्र.१क) विठ्ठल लडके यांचा ताबा आहे. विठ्ठल लडके याच्या ताब्यात शेती ही वादी केशव लडके यांच्याकडून आली.

३३. मी प्रतिवादी वासुदेव मोरे यांचा लेखी जवाब वाचला आहे. असे काही झाले नाही की वर्ष १९९०–९१ पासून वासुदेव मोरे हा कुळाच्या हक्काने वाद शेताची वहिती करीत होता. असे काही घडले नाही की सन १९९०–९१ आणि १९९१–९२ या वर्षी केशवने वाद शेत ठेक्याने वहिती केले होते. मी दि.०६.०३.२०१२ रोजी कुठे–कुठे गेलो आणि मी काय–काय केले हे मला सांगता येणार नाही.

३४. हे म्हणणे खरे आहे की एस.डी.ओ., वणी यांनी फेरफाराबाबत माझ्या पक्षात केलेल्या आदेशाविरुद्ध वादी केशव लडके हा अपीलामधे जिल्हाधिकारी यांच्याकडे गेला. हे मला माहित नाही की जिल्हाधिकारी यांनी केशव लडके यांचे ते अपील मंजूर केले. असे घडले नाही की आमचे सौदेपत्र दि.०६.०३.२०१२ रोजी न होता दि.१०.०२.२०१२ रोजी झाले आणि दि.१०.०२.२०१२ रोजी मला वाद शेताचा ताबा मिळाला. हे म्हणणे खरे नाही की वादी केशव लडके सन १९८९ पासून इसारपत्राच्या आधारे वाद शेताच्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की त्या सौद्याची संपुर्ण रक्कम वादी केशव लडके यांनी प्रतिवादी वासुदेव मोरे यांना दिली होती. हे म्हणणे खरे नाही की मी वादी केशव व त्याचा मुलगा विठ्ठल यांना वाद शेतातून बेदखल करण्यासाठी खोटा दावा दाखल करुन खोटा साक्ष हलफनामा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष दिली आहे.

**<u>उलट तपास पुर्ण</u>.**

**फेरतपास – काहीही नाही.**

समक्ष

Digitally signed by KAILAS PARASRAM DAWANE
Date: 2025.08.07 14:54:32 +0530

(के.पी. दवने)

मारेगाव.

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

दि.०७.०८.२०२५.

मारेगाव.